**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

**दिनांक १९/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील नबिरा ले आउट काटोल येथे दि. १७/०७/२०२२ चे २२.०० वा. ते १८/०७/२२ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नारायण मोतीरामजी वघाळे, वय ५४ वर्षे, रा. नबिरा लेआउट काटोल कामानिमित्त आपल्या घराला कुलुप लावून बाहेरगावी गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे लोखंडी गेटला लावलेले कुलुप व मुख्य दरवाजाला लावलेले चॅनल गेटचे दोन्ही कुलुप व लाकडी दरवाजाचे कडी कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने बेडरूममध्ये लोखंडी कपाटाचे कुलुप तोडुन आतील दोन्ही लॉकरमध्ये ठेवलेले सोन्या—चांदीचे दागिने कि. ९०,५००/—रू. चा माल चोरून नेला आहे. तसेच त्याच परिसरात राहणरे सिद्धार्थ सोमकुवर यांचेकडे किरायाने राहणारे सुनिल सुरशराव बुरबरे यांचे घराचा अज्ञात आरोपीने कुलुप कोंडा तोडून पॅन्टचे खिशातील नगदी २५००/—रू. असा एकुण ९३,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक कोरडे या करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. केळवद :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा जटामखोरा येथे दि. २१/०६/२०२२ ते १४/०७/२०२२ चे दरम्यान अज्ञात आरोपीने आरोग्य वर्धनी उपकेंद्र जटामखोरा येथे गोडाऊन मध्ये ठेवलेली उन्नती कंपनीची एक हॉर्स पॉवरची किंमत ४,९८०/— रूपयाची पाण्याची मोटर कुलुप तोडुन चोरून घेवुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— देवराव गोपीचंद पाचबुधे वय ४६ वर्षे रा. नागपूर ह.मु आरोग्य वर्धनी उपकेंद्र जटामखोरा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवलदार झिने मो नं ८४१२०२७०७५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा मेहदी नयाकुंड रोड येथे दि. २८/०६/२०२२ चे १८.०० वा. ते १८/०७/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान अज्ञात आरोपीने म.रा.वि.वि. केंद्र चे लावलेले श्री बापु मेश्राम, श्री प्रेमदास मेश्राम व प्रेमदास चव्हाण यांचे शेतात लघुदाब विदयुत वाहीनीचे सिमेंटचे ११ पोल मधील ॲल्युमीनीयम तार ०.७२ किमी लांबीचे किमती ७५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून कापुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्री प्रफुल सुखदेव डोंगरे, वय ४४ वर्षे, रा. पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रवी बर्वे मो.क्र. ९०९६५६५०७६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर